# यशोगाथा

## नवीन राष्ट्रीय बायोगॅस व खत व्यवस्थापन कार्यक्रम सन २०२४-२५

## लाभार्थी नाव - दिनकर नामदेव आंमबेकरमु.पो पिंपळगाव वाघा



मी दिनकर नामदेव आंबेकर मु.पो. पिंपळगाव वाघा **ता.अहिल्यानगर नवीन राष्ट्रीय** बायोगॅस **व खत** व्यवस्थापन कार्यक्रम सन २०२४-२५ अंतर्गत मी पंचायत समिती अहिल्यानगर यांचेमार्फत 3 घमी क्षमतेचे बायोगॅस सयंत्र बांधकाम पूर्ण केलेले असून सदर सयंत्राचा वापर मी दररोजचा स्वयंपाक करण्यासाठी केला जातो.तसेच सयंत्रामधून बाहेर पडणाऱ्या स्लरीचे व्यवस्थापन करून व स्लरी वाळवून त्यापासून उत्तम शेणखत बनविले जाते.सदर शेणखताचा व स्लरीचा वापर भाजीपाला पिकासाठी तसेच इतर पिकांसाठी केला जातो मी कोणत्याही प्रकारचे रासायनिक खताचा वापर करत नाही.सेंद्रिय पद्धतीने हंगामी भाजीपाला पिकवला जातो त्यामुळे माझ्या भाजीपाल्याला मागणी असते व बाजारभावसुद्धा इतर भाजीपाल्यापेक्षा जास्त मिळतो व मला त्यातून चांगले उत्पन्न मिळते.तसेच सिलेंडरचा वापर पूर्णपणे बंद झाल्यामुळे सिलेंडरचा पूर्ण खर्च कमी झाला तसेच रासायनिक खताचा सुद्धा खर्च कमी झाल्यामुळे आमची आर्थिक बचत झाली असा हा दुहेरी उपयोग झाल्यामुळे बायोगॅस सयंत्रबाबत आम्ही खूप खुश आहोत.बायोगॅस सयंत्र बांधकामासाठी आम्हाला केंद्राचे व जिल्हा परिषदेचे पूरक अनुदान मिळाल्यामुळे आम्हाला बांधकाम करण्यासाठी अर्थसहाय्य झाले व बायोगॅस चा व्यवस्थित वापर सुरु असून त्याबाबत कोणतीही तक्रार नाही.

# यशोगाथा

जिल्हा परिषद सेस फंड योजना सन २०२४-२५

लाभार्थी नाव - शशिकांत रंगनाथ मोकाटे मु.पो.बुरूडगाव ता.अहिल्यानगर जिल्हा-अहिल्यानगर




मी शशिकांत रंगनाथ मोकाटे मु.पो बुरूडगाव ता.अहिल्यानगर मी जिल्हा परिषद सेस फंड योजना सन २०२४-२५ अंतर्गत मी पंचायत समिती अहिल्यानगर यांचेमार्फत 3HP रिव्हर्स फोरवर्ड मॉडेलची कडबाकुट्टी खरेदी केली त्यासाठी मला ९००० रुपये अर्थसहाय्य मिळाले.

कडबाकुट्टी खरेदी करण्यापूर्वी मला उस,मका,कडवळ या चाऱ्याचे हाताने बारीक तुकडे करून जनावरांना द्यावा लागत असे त्यामध्ये जास्त वेळ जात असून शारीरिक कष्टाचे होते.तसेच जनावरांना उसासारखा चार खाताना त्रास होत होता व चारा वाया जाण्याचे प्रमाण जास्त होते.

कडबाकुट्टी खरेदी केल्यामुळे चारा कुट्टी करून जनावरांना दिला जातो त्यामुळे शारिरीक श्रम कमी झाले व जनावरांना चारा खाताना त्रास होत नाही ते आवडीने चारा खातात.त्यामुळे दुधाळ जनावरांचे दुधाचे प्रमाण वाढले.जनावरांना सकस चारा मिळू लागला व

चारा वाया जात नाही त्यामुळे चारयात बचत होवू लागली.तसेच चारा टंचाईच्या काळात मुरघास बनविण्यासाठी कडबाकुट्टीचा वापर होवू लागला.जिल्हा परिषदेचे पूरक अनुदान मिळाल्यामुळे कडबाकुट्टी खरेदीसाठी अर्थसहाय्य झाले व कडबाकुट्टी चा व्यवस्थित वापर सुरु असून त्याबाबत कोणतीही तक्रार नाही.

# यशोगाथा

जिल्हा परिषद सेस फंड योजना सन २०२४-२५ अंतर्गत

स्लरी फिल्टर यशोगाथा

लाभार्थी नाव- श्री.बापूराव नारायण शेळके मु.पो.अकोळनेर

ता.अहिल्यानगर

जिल्हा-अहिल्यानगर






मी बापूराव नारायण शेळके मु.पो अकोळनेर ता.अहिल्यानगर जिल्हा .अहिल्यानगर मी जिल्हा परिषद सेस फंड योजना सन २०२४-२५ अंतर्गत मी पंचायत समिती अहिल्यानगर यांचेमार्फत स्लरी फिल्टर उपकरण खरेदी करण्याबाबतची योजनेची माहिती पंचायत समिती अहिल्यानगर मधील कृषी विभागाकडून मिळाली त्यानुसार त्यांचे मार्गदर्शनाखाली मी अर्ज दाखल केला व त्यानंतर मला खरेदीसाठी पुर्वसंमती मिळाली तदनंतर तांत्रिक निकषानुसार मी कृषी विभागाच्या मार्गदर्शनाखाली पृथ्वीराज या कंपनीचे स्लरी फिल्टर उपकरण खरेदी केले

स्लरी फिल्टर बसविल्यानंतर त्याचा वापर जरबेरा,आणि ऑर्किड या फुल पिकांसाठी केला.स्लरी फिल्टर मध्ये स्लरी बनविण्यासाठी मी १० कि शेण,२ कि बेसनपीठ ,५ लिटर गोमुत्र व २ कि गुळ १००० लिटर पाण्यामध्ये मिसळले.हे द्रावण दिवसातून दोन वेळा

घड्याळ्याच्या काट्याच्या दिशेने ढवळले.चार दिवसानंतर सदर द्रावण तयार झाले नंतर ठिबक द्वारे मी वरील फुलपिकांना सोडले तसेच २० लिटर स्लरी २०० लिटर पाण्यामध्ये मिसळून पिकांवर फवारणी केली.

सदर फवारणी नंतर आठ दिवसांनी लगेच मला पिकामध्ये फरक जाणवू लागला पिकाची वाढ जोमदार दिसून आली फुलांच्या उत्पन्नामध्ये २५ टक्के वाढ झाली तसेच फुलांच्या गुणवत्ता हि वाढली त्यामुळे मला नेहमीपेक्षा जास्त विक्रीदर मिळाला त्यामुळे माझे आर्थिक उत्पन्न वाढले तसेच कीड रोग प्रादुर्भाव कमी झाल्याने माझा कीटक नाशके फवारणीचा खर्च कमी झाला.

# यशोगाथा

**राष्ट्रीय कृषि विकास योजना (अनुसुचित जमाती) सन 2024/25**

**लाभार्थीचे नाव –विजय भगवान लोमटे मु.पो.भोरवाडी ता.जि. अहिल्यानगर**

**राष्ट्रीय कृषि विकास योजना (अनुसुचित जमाती) सन** 2024/25 **अंतर्गत नविन विहिर साठी भरीव तरतूद करण्यात आलेली आहे.सदर योजने अंतर्गत अल्प**

उत्पन्न असलेल्या अनुसुचित जमाती संवर्गातील शेतक-यांना नविन विहिरीसाठी रक्कम रु 250000/- इतके भरीव अनुदान देण्यात येते.

अहिल्यानगर जिल्ह्यातील अहिल्यानगर तालुक्यातील भोरवाडी येथील श्री विजय भगवान लोमटे यांना श्री वाल्मिक सुडके कृषि अधिकारी (विघयो ) पंचायत समिती अहिल्यानगर यांनी सदर योजनेची सविस्तर माहिती दिली.श्री लोमटे यांची भोरवाडी येथे गट क्रमांक 444 मध्ये क्षेत्र 0.58 हेक्टर इतकी जिरायत शेतजमीन आहे.सदरची शेतजमीन जिरायत असल्याने सिंचनासाठी पावसाच्या पाण्यावर अवलंबून राहावे लागत होते ,परीणामी उत्पन्न अल्प होते.त्यामुळे त्यांना दुस-यांच्या शेतात मजूरी करुन उदरनिर्वाह करावा लागत होता.

त्यांना सदर योजनेची सविस्तर माहिती देऊन त्यांचा अर्ज कृषि विभागाच्या महाडीबीटी पोर्टल वर भरुन घेण्यात आला.त्यानंतर ऑनलाईन सोडतीमध्ये त्यांची निवड झाली.

कृषि विभाग पंचायत समिती अहिल्यानगर यांनी त्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करुन त्यांचा 7/12,8 अ खाते उतारा,जातीचा दाख़ला ,उत्पन्न दाख़ला ,आधार कार्ड ,बॅक पास बुक ,लाभार्थी निवडीचा ग्रामपंचायत कडील ठराव इत्यादी कागदपत्रांची छाननी करुन प्रस्ताव पात्र ठरल्याने सदर सर्व कागदपत्रे कृषि विभागाच्या महाडीबीटी पोर्टल वर ऑनलाईन अपलोड करण्यात आली.त्यानंतर त्यांचे क्षेत्राची स्थळ पाहणी करण्यात आली ,त्यांचा नविन विहिरीचा प्रस्ताव कागदपत्रांची छाननी व स्थळ पाहणी मध्ये पात्र ठरल्याने त्यांचे नविन




विजय भगवान लोमटे यांचे पूर्ण झालेले नविन विहिरीचे काम

विहिरीचे अंदाजपत्रक तयार करुन ते तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेसाठी मा.कृषि विकास अधिकारी जिल्हा परीषद अहिल्यानगर यांच्याकडे ऑनलाईन पाठविण्यात आले. मा.कृषि विकास अधिकारी जिल्हा परीषद अहिल्यानगर यांनी सदर प्रस्तावास मान्यता दिली व अनुदान रक्कम रु 250000/- उपलब्ध करुन दिले.

सदर प्रस्तावास मान्यता मिळाल्यानंतर मा.गट विकास अधिकारी (निवड श्रेणी ) पंचायत समिती अहिल्यानगर यांनी कार्यारंभ आदेश दिला व सदर नविन विहिरीस कृषि अधिकारी पंचायत समिती अहिल्यानगर यांनी आख़णी करुन दिली व नविन विहीरीचे काम सुरु झाले.सदर नविन विहिरीच्या झालेल्या कामाचे टप्याटप्याने मोजमापे घेऊन व मुल्यांकन करुन अनुदानासाठी कृषि विभाग जिल्हा परीषद अहिल्यानगर यांच्याकडे वेळोवेळी शिफ़ारस करण्यात आली.कृषि विभाग जिल्हा परीषद अहिल्यानगर यांनी वेळोवेळी एकूण अनुदान रक्कम रु 250000/- पी. एफ़. एम. एस. द्वारे थेट लाभार्थीच्या बॅक खात्यामध्ये वर्ग करण्यात आले.

सदर नविन विहिरीला समाधानकारक पाणी उपलब्ध झाले व त्यांची शेतजमीन बागायत झाली व त्यांना आपल्याच शेतात रोजगार उपलब्ध झाला.त्यांचे कृषि उत्पन्नात वाढ होऊन त्यांचे आर्थीक जीवनमान सुधारले व ख-या अर्थाने योजनेचा उद्देश सफ़ल झाला.

सदर कामाचा  श्री सुधीर शिंदे ,कृषि विकास अधिकारी .जिल्हा परीषद अहिल्यानगर यांनी वेळोवेळी आढ़ावा घेऊन अनमोल मार्गदर्शन केले. तसेच श्रीमती सोनाली हजारे ,जिल्हा कृषि अधिकारी (विघयो) यांनी सदर कामाबाबत वेळोवेळी सहकार्य व मार्गदर्शन केले.त्याचप्रमाणे श्री प्रमोद साळवे कृषि अधिकारी जिल्हा परीषद अहिल्यानगर यांनी वेळोवेळी आलेल्या अडचणी सोडवून सहकार्य केले. तसेच श्री कैलास झुंगे वरिष्ठ सहाय्यक कृषि विभाग जिल्हा परीषद अहिल्यानगर यांनी वेळोवेळी सहकार्य केले.